जा.क्र.पोआ/कक्ष—११(६)/१२८६/२०२१
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई
दिनांक:— ०५ /०९/२०२१

## आदेश

## पोलीस आयुक्त कार्यालय/गणेश चतुर्थी/८१२(१)/२०२१

विषय :— फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१)(३) प्रमाणे मनाई आदेश

(१) ज्या अर्थी कोविड—१९ मुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचा विचार करता या वर्षी गणेशोत्सव साजरा करण्याबाबत महाराष्ट्र शासन, गृह विभाग मंत्रालय मुंबई यांनी आरएलपी —०६२१/प्र.क्र. १४४/विशा—१ब दिनांक २९/०६/२०२१ अन्वये सार्वजनिक गणेशोत्सव २०२१ मार्गदर्शक सुचणां जारी करण्यात आलेल्या आहेत. व क्र. आरएलपी —०६२१/प्र.क्र. १४४/विशा—१ब दिनांक ०८/०९/२०२१ अन्वये गणेश मुर्तीचे मुखदर्शन अथवा प्रत्यक्ष मंडपात येऊन दर्शन घेण्यास प्रतिबंध करण्यात येत असून दर्शन केवळ ऑनलाईन अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्‌वारे उपलब्ध करून देण्यात यावे. असे शुध्दीपत्रक जारी करण्यात आलेले आहे.

(२) त्याअर्थी मी चैतन्य एस. पोलीस उप आयुक्त, (अभियान), मुंबई शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि. ०१/०४/१९७४ चे अधिसुचनेद्‌वारे प्राधिकृत अधिकारी, म्हणुन मुंबई शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौ.दं.प्र.सं. (१९७३ चे कलम २) अन्वये दिनांक १०/०९/२०२१ ते १९/०९/२०२१ रोजी पर्यंत **''मुखदर्शन अथवा प्रत्यक्ष मंडपात येऊन दर्शन घेण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याबाबतचा मनाई आदेश जारी करीत आहे.''** सदर आदेश हे पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यक्षेत्रात लागु राहतील. सदर मनाई आदेशात आयुक्त महानगरपालीका बृहन्मुंबई यांनी निर्गमित केलेल्या उपरोक्त आदेशातील सर्व अटी व शर्ती तसेच इतर निर्बंध कायम राहतील.

(३) दिनांक १०/०९/२०२१ ते १९/०९/२०२१ या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्रित जमणार नाहीत. तसेच कोणत्याही प्रकारची मिरवणुक काढण्यात येणार नाही.

(४) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ व प्रचलित कायद्यान्वये शिक्षेस पात्र राहिल.

(५) संबंधित ट्रस्टी वा आस्थापना यांना प्रत्येकास आदेशपुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौ.दं.प्र.सं. १९७३ चे कलम १४४ (२ ) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय, पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ०५ /०९/२०२१ रोजी दिलेला आहे.

(चैतन्य एस.)
पोलीस उप आयुक्त (अभियान)
पोलीस सह आयुक्त (का. व सु.)
मुंबई यांचेकरिता

ठिकाण :— मुंबई
दिनांक : — 05 /०९/२०२१